# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- १४०** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१४/०८/२०२४ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता झालेली सभा क्र.२७ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१४/०८/२०२४ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता झालेली सभा क्र.२७ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१४/०८/२०२४ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता झालेली सभा क्र.२७ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-१४१** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. विधीशाखा प्रमुख, विधी विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./विधी विभाग/४६/२०२४-२५ दि.०४/०९/२०२४

३. सहाय्यक आयुक्त (विधी) यांचा दि.२९/०८/२०२४ चा अभिप्राय

४. उपायुक्त (विधी) यांचा दि.२९/०८/२०२४ चा अभिप्राय

५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.३०/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.जिल्हा न्यायालय, मा.औदयोगिक न्यायालय, मा.कामगार न्यायालयात महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे मांडणे करीता प्रमुख विधी सल्लागार व वकील पॅनल नियुक्त करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व विधीशाखा प्रमुख, विधी विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव विरुध्द मा.जिल्हा व सत्र न्यायालय, मा.औदयोगिक न्यायालय, मा.कामगार न्यायालय, मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ, मा.उच्च न्यायालय मुंबई, मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल दावे / पिटीशन मध्ये महानगरपालिकेची बाजु प्रभावीपणे मांडणे करीता मा.स्थायी समिती ठराव क्र.१४७ दि.२९/०७/२०१९ अन्वये दि.०६/०९/२०१९ पासुन पाच वर्षाकरीता वकिल पॅनल नियुक्त करणेत आलेले होते. त्यानुसार मे.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली करीता ३, मे.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद करीता ०७, मे.जिल्हा व सत्र न्यायालय जळगांव करीता ३६, असे एकुण ४६ वकिलांची नियुक्ती सदर पॅनल मध्ये करण्यात आलेली होती. सदर पॅनल मधुन अॅड आनंद एस मुजुमदार यांची प्रमुख विधी सल्लागार म्हणुन पाच वर्षाकरीता नियुक्ती करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने स्थायी समिती ठराव क्र.१४७ दि.२९/०७/२०१९ अन्वये गठीत वकिल पॅनलची मुदत दि.०६/०९/२०१९ ते दि.०६/०९/२०२४ अशी पाच वर्षाकरीता होती.

सदर वकिल पॅनलची मुदत दि.०६/०९/२०२४ रोजी समाप्त होत असल्याने कार्यरत असलेले विधीज्ञ अॅड.केतन जयदेव ढाके,जळगांव यांनी दि.२१/०८/२०२४ रोजी दिलेला अर्ज विधी विभागात दि.२३/०८/२०२४ रोजी प्राप्त झाला असुन त्यांनी मुख्य विधी सल्लागार पदी नेमणुक करणेबाबत पत्रात नमुद केलेले आहे.

तसेच अॅड आनंद एस. मुजुमदार जळगांव यांनी दि.२२/०८/२०२४ रोजी दिलेला अर्ज विधी विभागात दि.२७/०८/२०२४ रोजी प्राप्त झाला असुन त्यांनी प्रमुख विधी सल्लागार या पदाचा त्यांचा कार्यकाळ दि.०६/०९/२०२४ रोजी समाप्त होत असल्याने पुन: प्रमुख विधी सल्लागार पदी नेमणूक होणेस व मानधन रक्कमच्या रक्कमेत वाढ करुन रक्कम रु.५०,०००/- मिळणेबाबत अर्जात नमुद केले आहे.

तरी कार्यरत विधीज्ञ व प्रमुख विधी सल्लागार यांना मुदत वाढ देणे अगर नवीन प्रमुख विधी सल्लागार नेमणे, नविन पॅनल नियुक्ती करणे कामी मान्यता मिळण्यासाठी विधीशाखा प्रमुख, विधी विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्ताव व वाचा क्र.१ ते ५ नूसार स्थायी समिती ठराव क्र.१४७ दि.२९/०७/२०१९ अन्वये दि.०६/०९/२०१९ पासून पाच वर्षाकरीता नियुक्त करण्यात आलेले आहे. त्याची मुदत दि.०६/०९/२०२४ रोजी संपत असल्याने सदर ठरावानूसार नियुक्त केलेल्या वकील पॅनल मधिल सर्व विधीज्ञ व प्रमुख विधी सल्लागार यांना एक वर्षासाठी उपरोक्त ठरावानूसार निश्चित केलेल्या फी व मानधनाप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

विधीज्ञ यांच्या संख्येत वाढ करावयाची झाल्यास त्यासाठी नियमाप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहीत कार्यपध्दतीनूसार विधी विभागाने कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. २८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-१४२** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./परिवहन/१८/२०२४ दि.०४/०९/२०२४
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.०४/०९/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०४/०९/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०४/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्र शासन पुरस्कृत पी एम ई बस सेवा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मेहरुण शिवार स.क्र.४१८, ४१९ या ठिकाणी स्थापत्य निगडीत कामांसंदर्भात मक्तेदार श्री श्री इनफ्रास्ट्रक्चर यांचे अंदाजपत्रकीय दराइतकेच दरास मान्यता देणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासन पुरस्कृत पी एम ई बस सेवा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मेहरुण शिवार स.क्र.४१८, ४१९ या ठिकाणी स्थापत्य निगडीत कामांसंदर्भात रक्कम रु.९.६७ कोटी अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी रक्कम रु.८.६९ कोटी रक्कमेस Central Sanctioning & Steering Committee ने १३ व्या मिटींग मध्ये मान्यता दिलेली आहे. तसेच मंजुर अनुदानापेक्षा जास्तीचा होणारा खर्च महानगरपालिका निधी मधून करणे व ई-निविदा प्रसिध्द करणेस महासभा ठराव प्रशासक ठराव क्र.१२८ दिनांक १९/०७/२०२४ नुसार मंजुरी प्राप्त आहे. सदर महासभा ठरावाच्या अनुषंगाने आयुक्त यांच्या दि.२४/०७/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार संदर्भीय ई-निविदा सुचना क्र.४९२/२०२४-२५ दि.२४/०७/२०२४ रोजी राष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर ई-निविदा भरणेकरीता दि.०२/०८/२०२४ पावेतो मुदत देण्यात आलेली असुन वेळापत्रकाप्रमाणे दि.०५/०८/२०२४ रोजी ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ अतिरिक्त आयुक्त यांच्या मान्यतेने उघडण्यात आलेला आहे. ई-निविदा प्रक्रियेमध्ये एकूण ०३ निविदाकारांनी सहभाग नोंदविलेला असुन प्राप्त कागदपत्रकांची विस्तृत छानती संबंधीत लिपीक, विभाग प्रमुख, शाखा अभियंता, पवडी उपलेखापाल, शहर अभियंता यांचेमार्फत करण्यात आलेली असुन निविदा समितीच्या दि.१४/०८/२०२४ रोजीच्या निर्णयानुसार निविदाकार क्र.०१ वैष्णवी बिल्डकॉन व निविदाकार क्र.०२ श्री श्री इन्फ्रास्ट्रक्चर यांस पात्र ठरवून निविदाकार क्र.०३ महादेव कन्स्ट्रक्शन यांस अपुर्ण कागदपत्रकांच्या अभावी अपात्र ठरविण्यात आलेले आहे. निविदा समितीच्या दि.१४/०८/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसारच आर्थिक लिफाफा क्र.०२ दि.१४/०८/२०२४ रोजी उघडण्यात आलेला असुन पात्र निविदाकार यांनी सादर केलेल्या ई-निविदा दरांच्या तुलनात्मक तक्त्याची संगणीकृत प्रत काढण्यात आलेली असुन तपशील खालीलप्रमाणे

पात्र निविदाकार यांनी सादर केलेल्या ई-निविदा दरांच्या तुलनात्मक दर लक्षात घेता निविदाकार श्री श्री इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर इतर मक्तेदारांपेक्षा कामाच्या निविदा रक्कमेवर ४.५२% जास्तीचे सर्वात कमी आलेले असले तरी सदर दर जास्त वाटत असल्याने संबंधीत निविदाकार यांस निविदा दर वाटाघाटीकरीता बोलविणे करीता जावक्र क्र. आ.का./१७६२ दि.२०/०८/२०२४ नुसार पत्र देण्यात आले असता सदर पत्राचे अनुषंगाने दि.२३/०८/२०२४ रोजी संबंधीतांसोबत चर्चा केली असता दर वाटाघाटीअंती मक्तेदार श्री श्री इन्फ्रास्ट्रक्चर यांनी निविदा दरामध्येच काम करणेस होकार दिलेला असुन त्याबाबतचे लेखी पत्र देखील मक्तेदार यांनी दि.२३/०८/२०२४ रोजी सादर केलेले आहे. तरी आलेल्या दरानुसार उपरोक्त कामी रक्कम रु.७,०१,४९,८२३/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार रॉयल्टी, मटेरीयल टेस्टींग चार्जेस, जी.एस.टी., कामगार विमा व इतर खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | वाटाघाटीअंती अपेक्षीत खर्च | रु.७,०१,४९,८२३/- |
| २ | रॉयल्टी | रु.१२,९०,९१५/- |
| ३ | मटेरीयल टेस्टींग चार्जेस | रु.५६,८२०/- |
| ४ | जी.एस.टी. | रु.१,२६,२६,९६८/- |
| ५ | कामगार विमा | रु.७,०१,४९८/- |
| ६ | इतर (इलेक्ट्रीफिकेशन व वॉटर वर्क चार्जेस, किरकोळ खर्च, थर्ड पार्टी ऑडीट, फर्निचर वर्क्स इ.) | रु.१,१९,२५,४६९/- |
| | एकूण अपेक्षीत खर्च रक्कम | रु.९,६७,५१,४९३/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन अपेक्षीत खर्च रकक्म रु.९,६७,५१,४९३/- मात्र अपेक्षीत आहे. सदर रक्कमपैकी रक्कम रु.८,६९,००,०००/- मात्र करीता केंद्र स्तरीय सुकाणू समिती बैठक क्र.१३ दि.२१/०६/२०२४ मधील इतिवृत्तानुसार मान्यता मिळालेली असुन त्यापैकी ६०% म्हणजेच रक्कम रु.५,२१,००,०००/- मात्र निधी केंद्र शासनाने मान्य केलेला आहे. मंजुर रक्कम रु.८,६९,००,०००/- मात्र पैकी ४०% म्हणजेच रु.३,४८,००,०००/- कोटी मात्र करीता राज्यस्तरीय सुकाणू समितीने दि.२५/०६/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार श्री श्री इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे निविदा दराइतकेच दर स्विकारण्यास निविदा समितीने सर्वानुमते शिफारस केलेली असून सदर दरास व होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३(क) नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. २८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:-१४३** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/२२/२०२४ दि.०४/०९/२०२४
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.१२/०८/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त (सा.प्र.)यांचा दि.१३/०८/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१३/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणेबाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व सहायक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणेबाबत पंप ऑपरेटर यांची मागणी क्रं.१४१०३ दि.०७/०८/२०२४ रोजी दिलेली असुन तसेच रिपोर्ट क्र.१९७९५ दि.०७/०८/२०२४ नुसार अखेर डिझेल साठा ४५९० लिटर शिल्लक असुन सदर डिझेल साठा ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२४-२५/०५ दि.०७/०८/२०२४ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,०४,४८०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता मिळण्यासाठी सहा.आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र.:- १४४** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहायक आयुक्त (वाहन), विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/२३/२०२४-२५ दि.०५/०९/२०२४
३. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.०१/०७/२०२४ रोजीचा अभिप्राय
४. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.१५/०७/२०२४ रोजीचा अभिप्राय

**विषय :-** मनपा विदयुत विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५६१८ (ईले.लॅडर) या वाहनाची दुरुस्ती करणेबाबत.

वाचा क्र.१ व सहा.आयुक्त (वाहन), विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका विदयुत विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५६१८ (ईले.लॅडर) हे वाहन विदयुत विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालील दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टसह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५६१८ (ईले.लॅडर) (उत्पादीत वर्ष-२०१८) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | Cylinder Servicing and oil seal Change | ४ | Hydraulic Oil - 26 Ltr |
| २ | PTO Air Shifter ०१ Nos | ५ | Stabilizer Out Repairing |
| ३ | PTO Shaft Cross - ०१ Nos | | |

वर नमुद वाहनाचे दुरुस्तीची कामे नविन पार्टस/ मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.देवेंद्र एन्टरप्राईजेस, जळगांव यांच्याकडिल कोटेशन दि.०६/०५/२०२४ अन्वये खर्च रक्कम रु.४०,४९०/- मात्र असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदरचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नूसार मे.देवेंद्र एन्टरप्राईजेस, जळगांव यांना रक्कम रु.४०,४९०/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेसाठी सहा.आयुक्त (वाहन), विभाग विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र.:- १४५** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आरोग्यधिकारी, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./५६२/२०२४-२५ दि.२९/०८/२०२४
३. सहायक आयुक्त,(आरोग्य) यांचा दि.२१/०८/२०२४ रोजीचा अभिप्राय
४. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.२३/०८/२०२४ रोजीचा अभिप्राय
५. उपायुक्त यांचा दि.०९/०८/२०२४ रोजीचा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १.श्री.नंदु शहादु नाडे, २.श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.१८/०७/२०२४ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१६,९२०/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करित असून मा.प्रशासक ठराव क्रं.९६ दि.२६/०२/२०२४ मंजूरी अन्वये दरमहा रु.१६,९२०/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरर्ती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत दि.०७/०७/२०२४ रोजी संपत असल्याने पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

करिता श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.१०/०७/२०२४ ते दि.१०/०१/२०२५ पर्यंत (६ महिने) तात्पुरर्ती नियुक्ती देणे कामी रु.१६,९२०/- प्रत्येक कामगार प्रमाणे दरमहा सहा महिनेकरिता एकूण रु.२,०३,०४०/- खर्च अपेक्षीत आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना ६ महिन्याचा कालावधीत मानधनासाठी होणाऱ्या रु.२,०३,०४०/- खर्च हा वार्षिक अंदाजपत्रकीय म.न.पा. फंड रोजंदारी/मानधन या लेखाशिर्षा अंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. तरी मानसेवी कामगार यांना तात्पुरर्ती नियुक्ती आदेश देणेस मान्यता मिळणेसाठी आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र.:- १४६** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व. बांधकाम विभाग/१०७२/२०२४-२५ दि.०५/०९/२०२४

३. सहाय्यक आयुक्त (बांधकाम) यांचा दि.०८/०७/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्यलेखाधिकारी यांचा दि.१९/०७/२०२४ चा अभिप्राय

५. मुख्यलेखापरिक्षक यांचा दि.१९/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०४ जुने जळगांव गावठाण चौधरी वाडा ते भाग्यलक्ष्मी टेंन्ट हाऊस पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०४ जुने जळगांव गावठाण चौधरी वाडा ते भाग्यलक्ष्मी टेंन्ट हाऊस पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी प्राप्त झालेल्या दरांच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मक्तेदार श्री.निखिल कृष्णराज पाटील, जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस व त्यानुसार सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.७२,५०,३२७/- मात्र इतका आहे. सदर खर्चास व सदर खर्च सन २०२४-२५ चे नविन रस्ते या लेखाशिर्षकाखाली करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेबाबत शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०८** **प्रशासक ठराव क्र.:- १४७** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व. बांधकाम विभाग/१०९४/२०२४-२५ दि.०९/०९/२०२४

३. नगररचनाकार यांचा अभिप्राय

४. प्रमुख वैदयकीय अधिकारी यांचा अभिप्राय

५. मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय

६. अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय

**विषय :-** अर्बन हेल्थ ॲण्ड वेलनेस सेंटर करीता इमारती भाडयाने घेणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१६/०७/२०२४ रोजी अर्बन हेल्थ वेलनेस सेंटर करीता इमारती भाडयाने घेणे बाबत आयुक्त् यांचे दि.१६/०७/२०२४ चे मंजुरीनुसार दै.दिव्य मराठी या वृत्तपत्रात जाहिर देकार सुचना प्रसिध्द करण्यात आली. देकार सुचनांची अंतिम दि.२२/०७/२०२४ होती. विहीत मुदतीत एकुण १५ देकार सुचना प्राप्त झालेल्या असुन नगररचना विभागाने त्यांचे संदर्भ पत्र क्र.जा.क्र/न.र./५१२ दि.२४/०७/२०२४ अन्वये जागा निहाय भाडेपट्टा काढुन देण्यात आलेला आहे त्या नुसार नगररचना विभागाने काढुन देण्यात आलेल्या शासकीय भाडेपट्टया दरापेक्षा जास्तीचे असल्याने एकुण १५ देकार यांना दि.०९/०८/२०२४ रोजी वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले असता त्यांनी वाटाघाटीवेळी आयुक्त, प्रमुख वैदयकीय अधिकारी, नगररचनाकार व शहर अभियंता यांचे समक्ष त्यांचे म्हणणे मांडलेले आहे.

प्रमुख वैदयकीय अधिकारी यांनी सदयस्थितीत संदर्भ क्रं.२ च्या प्रस्तावातील १५ जागांपैकी खालील फक्त चारच जागा अर्बन हेल्थ व वेलनेस सेंटर करीता शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार योग्य आहेत असे समक्ष सांगितल्यानुसार दवाखान्यासाठी आवश्यक असलेल्या चार जागांबाबतचा तपशिल व वाटाघाटी अंतर्गत दिलेले दर खालीलप्रमाणे

| अ.नं. | परिसर | घर मालकांचे नांव | गट नं. | प्लॉट नंबर | बांधीव क्षेत्र फळ चौ.मी | वाटाघाटी अंतर्गत दिलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आव्हाणे शिवार चंदु आण्णा नगर जवळ | संगिता विश्वास पाटील | आव्हाणे ३१३/२ब | १६ (२) | ३८.२० चौ.मी. | रक्कम रु.२०,०००/- प्रति माह भाडे (सर्व करासहित) यामध्ये घरपट्टी मिळकतधारक भरतील व लाईटबील मनपा ला भरावे लागेल. |
| २ | आशाबाबा नगर परिसर | भुषण चंद्रकांत बरकले | पिंप्राळा गट नं.८०/१/२ अ | ०१ | ८७.५८ चौ.मी | रक्कम रु.२५,०००/- प्रति माह भाडे (सर्व करासहित) यामध्ये घरपट्टी मिळकतधारक भरतील व लाईटबील मनपा ला भरावे लागेल. |
| ३ | हरिविठ्ठल नगर | दिपक प्रभाकर चव्हाण | पिंप्राळा गट नं.१२८/१ | ०१ | ८९.९४ चौ.मी | रक्कम रु.३०,०००/- प्रति माह भाडे (सर्व करासहित) यामध्ये घरपट्टी मिळकतधारक भरतील व लाईटबील मनपा ला भरावे लागेल. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | समता नगर परिसर | चंद्रकांत गंगाधर वाणी | मेहरुण स.नं.४४८/१ ब | २८ | ३१.७७ चौ.मी. | रक्कम रु.१५,०००/- प्रति माह भाडे (सर्व करासहित) यामध्ये घरपट्टी मिळकतधारक भरतील व लाईटबील मनपा ला भरावे लागेल. |

वरील चार जागांचे दरमहा भाडे जागांचे आवश्यकता विचारात घेता भाडे निश्चित करणे कामी मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्ताव व वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार वरील चार घरमालकांनी वाटाघाटीअंती दिलेल्या दरांना (प्रति माह भाडयास) मंजूरी देण्यात येत आहे. शहर अभियंता यांनी उपरोक्त चार घरमालकांसोबत तात्काळ नियमाप्रमाणे करारनामा करुन घेवून रितसर जागा ताब्यात घेणेबाबतची कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०९** **प्रशासक ठराव क्र.:- १४८** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जमनपा/प्रकल्प विभाग/७७/२०२४-२५ दि.११/०९/२०२४

**विषय :-** जळगांव महानगरपालिके अंतर्गत अमृत मलनिस्सारण १.० योजनेचे कामी जोडणीसाठी लायसन्स परवाना देणेकामी विविध अर्जाचे नमुने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७३ अन्वये मार्गदर्शक सुचना विहीत करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मलनिस्सारण योजनेचे पाच झोन आहेत. यापैकी झोन क्रमांक १ व ४ यातील कामे अमृत अभियानांतर्गत पूर्ण झालेली असून ४८ दशलक्ष लिटर क्षमतेचे मैला प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले असून सदयस्थितीत चाचणी कामे सुरु आहेत. प्रशासक ठराव क्रमांक ६३ दि.१२/०२/२०२४ नुसार घरगुती जोडणीसाठी रुपये १२००/- प्रति जोडणी व बिगर घरगुती जोडण्यासाठी रुपये १५००/- प्रति जोडणी वार्षिक दर निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच नागरीकांकडून अर्जासोबत आकारावयाचे जोडणी शुल्क रुपये रु.१०००/- निश्चित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७४ अन्वये विविध प्रकारच्या जोडणीसाठी आकारावयाचे शुल्क निश्चित केलेले असुन त्यास प्रशासक ठराव क्रमांक १३८ दि.०८/०७/२०२४ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

१) सदर कामी नळ कारागीर यांना जोडणीसाठी लायसन्स देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७२ नुसार कार्यवाही सुरु असुन लायसन्स देणेसाठी अर्जदाराने करावयाचा अर्ज, लायसन्स धारकास महानगरपालिकेत सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र व इतर कागदपत्रे, लायसन्स नूतनीकरणासाठी अर्जाचा नमुना, घरगुती/बिगर घरगुती जोडणीसाठी नागरिकाने करावयाचा अर्जाचा नमुना तयार करण्यात आलेले असून त्यांचे अवलोकन होवून मान्यता मिळणेबाबत..

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७३ अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेने सर्वेक्षक इत्यादींच्या मार्गदर्शनासाठी आदेश विहित करता येईल अशी तरतूद आहे, त्यानुसार सोबत जोडणी करण्यासाठी विहित मार्गदर्शक तांत्रिक सूचना तयार करण्यात आलेल्या असून सदरच्या तांत्रिक सूचनांना स्थायी समितीची मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. तथापी विभागाने अर्जाचे नमुने तसेच तांत्रिक सूचना संबंधीत अधिकारी व मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून तपासून घ्याव्यात.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. २८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-१०** **प्रशासक ठराव क्र.:-१४९** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/०३१/२०२४-२५ दि.११/०९/२०२४

३. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०९/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा मशिन क्र.एम.एच.१९ सी.एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) या वाहनाकरीता नविन साहित्य खरेदी करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका आरोग्य विभागाकडील मनपा मशिन क्र.एम.एच.१९ सी.एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) हे मशिन आरोग्य विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर रोड स्विपर मशिन करिता नविन पार्टस् मजुरीसह खरेदी करणे कामी खालीलप्रमाणे नविन स्पेअर पार्टस् मजुरीसह खरेदी करणे तांत्रिकदृष्टया आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा मशिन क्र.एम.एच.१९ सी.एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) (उत्पादीत वर्ष २०२३) | |
|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे |
| १ | Red Nozzles Crapper Pad Assy. - ०२ Nos |
| २ | Centre Brush २००० MM - ०२ Nos |
| ३ | Side Brush ५०० MM (Mix) (Bopnyls ०००४७) -०६ Nos |

वर नमुद मशिनचे नविन पार्टस्/ मजुरीसह खरेदी करणे कामी M/s KAM-AVIDA, Enviro Engineers PVT LTD Pune यांच्या कडील कोटेशन नं. SQ-CSC२४२५-०००६८ दिनांक २३/०५/२०२४ अन्वये खर्च रक्कम रुपये २,१४,७६०/- मात्र अपेक्षित असून सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत आहे. सदर खर्चास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) अन्वये M/s KAM-AVIDA, Enviro Engineers PVT LTD Pune यांना रक्कम रुपये २,१४,७६०/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. २८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-११** **प्रशासक ठराव क्र.:-१५०** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. विदयुत विभाग प्रमुख यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मनपा/विदयुत/२०७/२०२४-२५ दि.११/०९/२०२४

३. शहर अभियंता यांचा अभिप्राय

४. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय

५. निविदा समितीचा निर्णय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका मालकीचे टी.बी. सॅनीटोरीयम हॉस्पीटल येथे ई- बस चार्जींग स्टेशन कामी रोहित्र/लघुदाब विज वाहिनी उभारणी करणे व अनुषंगीक तांत्रिक कामे करणे.

---

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका मालकीचे टी.बी. सॅनीटोरीयम हॉस्पीटल येथे ई- बस चार्जींग स्टेशन कामी रोहित्र/लघुदाब विज वाहिनी उभारणी करणे व अनुषंगीक तांत्रिक कामे करणे कामी विहीत मुदतीत १)लक्ष्मीछाया इलेक्ट्रीकल्स,जळगांव २)प्रगती इंजीनीयरींग वर्क्स,धुळे या दोन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर ई-निविदेत सहभागी निविदाधारक यांनी फोल्डर क्रं.१ मध्ये आवश्यक असलेले कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचे फोल्डर क्रं.२ मध्ये आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.क्रं. | ई निविदाधारकाचे नांव | ई-निविदा रक्कम | ई-निविदेत आलेले दर | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | प्रगती इंजीनीयरींग वर्क्स,धुळे | रु.१,६९,५१,४३२/- | ३.१७०% कमीचे<br>रु.१,६४,१४,०७१.६०६ | रु.१,६४,१४,०७१/- |
| २ | लक्ष्मीछाया इलेक्ट्रीकल्स,जळगांव | | २.५००% कमीचे<br>रु.१,६५,२७,६४६.२०० | रु.१,६५,२७,६४६/- |

वर नमुद तक्ता पाहता ई-निविदाधारक प्रगती इंजीनीयरींग वर्क्स,धुळे यांचे दर सर्वात कमीचे म्हणजे निविदा रक्कमेपेक्षा ३.१७०% कमीचे आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.१,६४,१४,०७१/- मात्र इतका खर्च ई-निविदेप्रमाणे आहे. परंतु ई निविदेत नमुदप्रमाणे आलेल्या दरानुसार GST या रक्कमेचा खालीलप्रमाणे समावेश करावयाचा आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | ई निविदाप्रमाणे अपेक्षीत खर्च | रु.१,६४,१४,०७१/- |
| २ | GST १८% | रु.२९,५४,५३३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च | रु.१,९३,६८,६०४/- |

वर नमुदप्रमाणे निविदेत आलेल्या दरानुसार व GST सह अपेक्षीत खर्च रक्कम रु.१,९३,६८,६०४/- मात्र इतका आहे. परंतु ई-निविदाधारक प्रगती इंजीनीयरींग वर्क्स,धुळे यांचे ई-निविदा रक्कमेपेक्षा ३.१७०% कमीचे दर आलेले असल्याने शासन निर्णय क्रं.सीएटी/२०१७/प्र.क्र./०८/ईमा-२ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२७/०९/२०१८ मधील परिच्छेद क्रं.४-६-३ मध्ये नमुद व शासन परिपत्रक दिनांक २६/११/२०१८ चे तरतुदीनुसार व निविदा अटीशर्तीनुसार मक्तेदार यांचेकडुन १ ते १०% कमीच्या दरापर्यंत १% याप्रमाणे परफॉमन्स सेक्युरीटी डी.डी. सादर करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने ई-निविदाधारक प्रगती इंजीनीयरींग वर्क्स,धुळे यांना १% परफॉमन्स सेक्युरीटी म्हणून अनामत रक्कम रु.१,९३,६८६/- मात्रचा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी मनपा खजीन्यात सादर करणे करिता मनपा/विदयुत/२०२/ दि.०३/०९/२०२४ रोजीचे पत्राव्दारे कळविण्यात आलेले होते.

ई-निविदाधारक प्रगती इंजीनीयरींग वर्क्स,धुळे यांनी मुदतीत मनपा पावती क्रं.४५४६ दि.०५/०९/२०२४ रोजी रक्कम रु.१,९३,६८६/- मात्रचा डी.डी.क्रं.४४९३२१ दि.०५/०९/२०२४ अन्वये मनपा खजिन्यात जमा केलेला आहे. त्यानुसार सदर कामी वर नमुद केलेप्रमाणे निविदेत आलेले दरात शासकिय कर समाविष्ट करुन एकुण रक्कम रु.१,९३,६८,६०४/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. सदर कामाचा खर्च हा केंद्र पुरस्कृत पी.एम.ई.बस सेवा योजने अंतर्गत करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने ई-निविदाधारक प्रगती इंजीनीअरींग वर्क्स,धुळे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ३.१७०% कमीचे दर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ चे कलम ७३ (ड) नुसार स्वीकरणेस मान्यता मिळणेसाठी विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**